**नि.फौ.ख.क्र.२४/२०२६**
आर.पी.एफ. पुणे -वि.- रोहीत जाधव
**निशाणी क्र. ८**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – संतोष पंडीत जायभाये (चौकशी अधिकारी)
वय – ४१ वर्षे, व्यवसाय – एएसआय, रेसुब, पुणे
रा.- घोरपडी, पुणे.

**<u>दोषारोपापुर्वी सरतपासणी सरकारी अभियोक्ता श्री.गौरव कुमार सिंग यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

दि. १४/१०/२०२५ रोजी मी सहा.उपनिरीक्षक या पदावर रेसुब कार्यालय, पुणे येथे नेमणुकीस होतो. त्यादिवशी मुख्य सर्तकता अधिकारी, मुंबई यांनी निरीक्षक साहेबांना एक व्यक्ती, मेमो व संयुक्त नोट दिली होती. तसेच पुढील चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. आता मला सदरचा मेमो व संयुक्त नोट मी स्विकारली होती. त्यावर माझी प्राप्तकर्ता म्हणुन स्वाक्षरी आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. ९ व नि.क्र. १०** देण्यात येतो.

२. चौकशी दरम्यान त्या व्यक्तीने त्याचे नाव शमशुददीन मोहंमद इस्माईल असे सांगितले. त्याने सांगितले की, तात्काळचे तिकीट काढण्याकरीता तो रेल्वे स्टेशन येथे आला होता त्यावेळी रोहीत जाधव हा त्याला तेथे भेटला होता. रोहीतने त्याच्याकडुन ५००/- रुपये जास्तीचे घेवुन तात्काळच्या लाईनमध्ये सर्वात पुढे उभे केले. तसेच रोहीतने त्याच्या आरक्षण फॉर्ममध्ये स्वतःचे तीन नावे समाविष्ट केली होती. त्यानंतर मी दोन पंचाना बोलावुन घेतले व सदरील व्यक्तीच्या ताब्यातील १ तिकीट जप्त केले. त्यानुसार जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, पंचाची व शमशुददीन याची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र.११** देण्यात येतो. आता मला जप्त तिकीट दाखवण्यात आले. त्यावर माझी, पंचाची व शमशुददीन याची स्वाक्षरी असुन त्यास **नि.क्र.१२** देण्यात येतो.

३. चौकशी दरम्यान मी शमशुददीनचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. आता मला सदरचा जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी व शमशुददीन याची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र.१३** देण्यात येतो.

४. मी मुख्य आरक्षण परीवेक्षक, पुणे यांना सदरचे तिकीट रदद करण्याकरीता पत्र व्यवहार केला तसेच त्यांच्याकडुन आरक्षण फॉर्मचे प्रमाणीत प्रतची मागणी केली. आता मला दि. १४/१०/२०२५ रोजीचे पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र.१४** देण्यात येतो. आता मला आरक्षण फॉर्मची प्रमाणीत प्रत दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यास **नि.क्र.१५** देण्यात येतो.

५. मी दि. २७/११/२०२५ रोजी रोहीत जाधव यांना नोटीस देवुन चौकशीसाठी आमचे कार्यालयात बोलावुन घेतले होते. दि. २८/११/२०२५ रोजी तो आमचे कार्यालयात आला असता त्याचा जबाब मी पंचा समक्ष त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला. तो जबाब दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरचा जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी, पंचाची व रोहीत याची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र.१६** देण्यात येतो. त्याने जबाबात सांगितले की, दि. १४/१०/२०२५ रोजी शमशुददीन याचेकडुन तिकीटापेक्षा जास्तीचे ५००/- रुपये घेवुन रेल्वे तिकीटांचा अवैध व्यापार केला आहे. त्यानंतर मी त्यास या गुन्हयात अटक केली. चौकशी दरम्यान मी पंचाचे व इतर साक्षीदारांचे जबाब देखील नोंदवले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात तक्रारपत्र दाखल केले. मी आरोपीस ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास दोषारोपापर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

दि. ०२/०७/२०२६
स्थळ - पुणे

(एन.जे.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

**नि.फौ.ख.क्र.२४/२०२६**
आर.पी.एफ. पुणे -वि.- रोहीत जाधव
**निशाणी क्र. ८**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – संतोष पंडीत जायभाये (चौकशी अधिकारी)
वय – ४१ वर्षे, व्यवसाय – एएसआय, रेसुब, पुणे
रा.- घोरपडी, पुणे.

**<u>दोषारोपानंतर आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. ए.टी.नावडकर यांचेमार्फत सुरू-</u>**

६. प्रस्तुतच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मला तोंडी आदेश देण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, एखादा व्यक्ती स्वतःचे व मित्राचे तसेच नातेवाईकांचे तिकीट काढत असेल तर तो या कलमा अंतर्गत गुन्हा ठरत नाही. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात आरोपीने स्वतःचे नावे तिकीट काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, शमशुददीन याचा जबाब मी त्याच्यावर दबाव टाकुन खोटा नोंदवला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रोहीत याचा जबाब देखील त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांना कामगिरी दाखवण्याकरीता या आरोपीविरुध्द खोटी केस दाखल करुन खोटी चौकशी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.02 17:16:20 +0530

दि. ०२/०७/२०२६
स्थळ - पुणे

(एन.जे.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.